# शांततेसाठी सहकार्य!

## मोदी -पुतिन चर्चा; युक्रेन वादावर शांततापूर्ण तोडग्यासाठी आग्रह

**पीटीआय, कझान**




**रशिया आणि** युक्रेनदरम्यान फेब्रुवारी २०२२पासून सुरू असलेले युद्ध थांबवण्यासाठी भारत सर्व सहकार्य करायला तयार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी सांगितले. रशियाच्या कझान शहरामध्ये मंगळवारपासून सुरू होत असलेल्या १६व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदी यांचे आगमन झाले. त्यानंतर पुतिन यांच्याबरोबरच्या द्विपक्षीय चर्चेदरम्यान मोदी यांनी रशिया-युक्रेन संघर्षाचे शांततापूर्ण पद्धतीने निवारण झाले पाहिजे या भूमिकेचा पुनरुच्चार केला.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या सुरुवातीच्या भाषणात पुतिन यांना सांगितले की, रशिया-युक्रेन प्रदेशामध्ये पुन्हा शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी भारताचा पूर्ण पाठिंबा आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये आपली रशियाला ही दुसरी भेट आहे याचा उल्लेख करून, त्यातून दोन्ही देशांदरम्यान घट्ट संबंध आणि दृढ विश्वास दिसून येत असल्याचे मोदी म्हणाले. आम्हाला सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्याची संधी मिळाली असेही ते पुढे म्हणाले.

> सध्या सुरू असलेल्या रशिया आणि युक्रेनदरम्यानच्या संघर्षाच्या मुद्द्यावरून आम्ही सातत्याने एकमेकांच्या संपर्कात आहोत. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, ही समस्या शांततापूर्ण मार्गाने सोडवली पाहिजे यावर आमचा विश्वास आहे. मानवतेला प्राधान्य देण्याचे आमचे प्रयत्न आहेत. आगामी काळात भारत शक्य ते सर्व सहकार्य करायला तयार आहे.
> – **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

### मोदी, जिनपिंग आज चर्चा

**पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांची बुधवारी द्विपक्षीय चर्चा होणार असल्याची माहिती परराष्ट्र विभागाचे सचिव विक्रम मिस्री यांनी मंगळवारी दिली. "उद्या ही बैठक होत असल्याचे मी खात्रीने सांगू शकतो," असे मिस्री यांनी माध्यमांना सांगितले. यापूर्वी, ११ ऑक्टोबर २०१९ रोजी चेन्नईजवळील ममल्लापुरम येथे दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय चर्चा केली होती.**

## दहशतवादी पाकिस्तानातून आल्याचा संशय

**एक्स्प्रेस वृत्त**

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील दहशतवादी हल्ल्यानंतर पोलिसांनी जिल्ह्यातून जवळपास ५० जणांची धरपकड केली. दहशतवाद्यांनी रविवारी लेह-श्रीनगर महामार्गावरील बोगद्याचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात एका डॉक्टरसह सहा मजुरांचा मृत्यू झाला होता. या घटनेचे काश्मीर खोऱ्यात तीव्र पडसाद उमटले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात असे आढळून आले आहे की, मजुरांना लक्ष्य करून गोळीबार करणारे दहशतवादी पाकिस्तानातून आलेले घुसखोर असावेत आणि ते बांदीपोराच्या मार्गाने गांदरबलमध्ये दाखल झाले असावेत. तपासामध्ये हल्लेखोर स्थानिक असल्याची कोणतीही माहिती मिळालेली नाही असे पोलिसांनी सांगितले. त्यांनी हल्ला केलेले मजूर 'एपीसीओ इन्फ्राटेक' कंपनीसाठी काम करत होते, ही कंपनी श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावील कंगन गाव आणि सोनमर्गला जोडणाऱ्या झेड-मोढ बोगद्याचे बांधकाम करत आहे.

पोलिसांच्या सूत्रांनी माहिती दिली की, त्यांच्याकडे हल्ल्याची कोणतीही ठोस माहिती नाही, सध्या संशयितांना ताब्यात घेतले आहे. आणखीही काही जणांना ताब्यात घेतले जाऊ शकते असे त्यांनी सांगितले. हल्लेखोर दहशतवाद्यांनी अलिकडेच गुरेज सेक्टरमधून काश्मीर खोऱ्यात घुसखोरी केली असावी.

# गस्तकराराला चीनकडूनही पुष्टी

## लडाखसंबंधी भारताच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशी प्रतिक्रिया

**पीटीआय, बीजिंग**



**भारत आणि चीन** यांचे सैन्य लडाखमध्ये गेल्या चार वर्षांपासून समोरासमोर उभे ठाकल्याने निर्माण झालेला तणाव संपुष्टात आणण्यासंबंधी भारताबरोबर करार केल्याच्या माहितीला चीनने मंगळवारी अधिकृत दुजोरा दिला. मात्र, या कराराचे तपशील देण्यास चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने नकार दिला. भारताने चीनशी प्रत्यक्ष ताबारेषेवर (एलएसी) गस्त घालण्यासंबंधी करार झाल्याचे सोमवारी जाहीर केले. करारातील तपशील भारतानेही दिलेले नाहीत.

भारताने सोमवारी चीनबरोबर लडाखमध्ये 'एलएसी'वर असलेला चार वर्षांपासूनचा पेच संपल्याची घोषणा केली. त्यावर प्रतिक्रिया देताना चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी भारताशी तणाव संपुष्टात आणण्यासाठी करार झाल्याची माहिती दिली. जियान यांनी सांगितले, की गेल्या काही काळात भारत आणि चीन यांच्यात सीमावादावर राजनैतिक आणि लष्करी पातळीवर चर्चा सुरू होती. पेच असलेल्या मुद्द्यांवरील उपायांबाबत दोन्ही देशांत आता सहमती झाली आहे. या कराराची अंमलबजावणी करण्यासाठी चीन भारताबरोबर काम करील. अधिक तपशील देण्यास त्यांनी नकार दिला.

भारताने सोमवारी लडाखमधील चीनबरोबरील तणाव निवळल्याची घोषणा केल्यानंतर चीनकडून या कराराबद्दल कुठलीही माहिती जाहीर करण्यात आली नाही. तसेच, चीनमधील कुठल्याही माध्यमांनी त्याचे वृत्तांकन केले नव्हते. त्यामुळे तणाव निवळण्याच्या आणि चीनबरोबर करार झाल्याच्या भारताच्या घोषणेनंतर चीन काय प्रतिक्रिया देतो, त्याकडे सर्वांचे लक्ष होते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग 'ब्रिक्स' शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासंबंधी रशियाला रवाना झाल्यानंतरच चीनने या करारावर अधिकृत भाष्य केले.

**करारातील तपशीलाबाबत गूढ कायम**

भारत आणि चीनमधील लडाखमध्ये गस्तीच्या करारातील तपशील भारताने आणि चीनने दिलेले नाहीत. त्यामुळे पेच सुटला म्हणजे नेमके काय झाले आणि कुठल्या अटींवर हा करार करण्यात आला, हे गुलदस्त्यात आहे. राजनैतिक आणि लष्करी पातळीवरील चर्चेने सुटलेल्या या पेचात कुणाचे पारडे वरचढ ठरले, हे चर्चेचे तपशील समोर आल्यानंतरच समजणार आहे.

**सैन्यदलांकडून स्वागत**

प्रत्यक्ष ताबारेषेवर सामान्य स्थिती येण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे असे मत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी व्यक्त केले. परस्परविश्वास तयार झाला, तर प्रक्रियेतील इतर टप्पेही व्यवस्थित पार पडतील असे ते म्हणाले. तर, राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवरील पेच सोडविणे हे फारसे सोपे नसते, असे प्रतिपादन नौदलाचे उपप्रमुख व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी मंगळवारी केले. ही बातमी आनंददायी असल्याचे ते म्हणाले.

> आपल्याला २०२० पूर्वीची स्थिती लडाखमध्ये हवी होती. त्यानंतर आपल्याला सैन्यमाघारी हवी होती. तणाव निवळण्याची गरज होती. तसेच, प्रत्यक्ष ताबारेषेवर (एलएसी) सामान्य स्थिती येण्याची आवश्यकता होती. ती प्रक्रिया आता सुरु झाली आहे. अशी सामान्य स्थिती येण्यामध्येही काही टप्पे आहेत. परस्परविश्वास तयार झाला, तर प्रक्रियेतील इतर टप्पेही व्यवस्थित पार पडतील.
> – **जनरल उपेंद्र द्विवेदी**, लष्करप्रमुख

> आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवर एखाद्या समस्येवर उपाय काढणे सोपे नसते. त्यामध्ये एकमेकांची मते असतात. भूसीमा आणि राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करावा लागतो. दोन्ही देशांत ही समस्या सुटण्यावर एकमत झाले आहे आणि त्याचा आपल्या सर्वांना आनंद झाला आहे. – **व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन**, नौदल उपप्रमुख


**Bank of India** Relationship beyond banking

अंधेरी लार्ज कॉर्पोरेट ब्रँच : एम.डी.आय. बिल्डिंग, पहिला मजला, २८, एस.व्ही. रोड, अंधेरी (प.), मुंबई-४०० ०५८.
फोन : ०२२-२६७१३७३०.
ईमेल : andherilcb.mumbainorth@bankofindia.co.in

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) मधील तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार / जामीनदार / गहाणकार व संचालक आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की स्टेट बँक ऑफ इंडिया, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया आणि ॲक्सिस बँक (एकत्रितपणे 'सुरक्षित धनको' असा उल्लेख करण्यात येईल) चा समावेश असलेल्या बँकेच्या संघामधील अग्रणी बँक म्हणून बँक ऑफ इंडिया ('BOI' किंवा 'अग्रणी बँक') कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेची 'जशी आहे जेथे आहे', 'जशी आहे जे काही आहे', 'तेथे जे काही आहे' आणि 'उपाय नाही' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. सुरक्षित धनकोच्या थकबाकीची पुढील व्याज, शुल्के व खर्च इ. सह वसुली करण्यासाठी एका मूळ प्रस्तावकाराने ('Anchor Bidder') ऑनलाइन ई-लिलावाच्या माध्यमातून केलेल्या विद्यमान प्रस्तावाच्या आधारे ही विक्री 'स्विस चॅलेंज मेथड'च्या माध्यमातून सरफेसी अधिनियमांतर्गत करण्यात येत आहे. अनामत मत्ता खरेदी करावयास इच्छुक संभाव्य बोलीदार कोणत्याही उच्च रकमेची बोली देऊ शकतात आणि Anchor Bidder ला तिच्या बरोबरीची बोली द्यावी लागेल. आणि मूळ प्रस्तावकार ('Anchor Bidder') सर्वोच्च बोलीची बरोबरी करू न शकल्यास अनामत मत्तेची ऑनलाइन ई-लिलावामध्ये सर्वोच्च बोलीदारास विक्री करण्यात येईल.

BOB कॅपिटल मार्केट्स लि. ('BOBCAPS') यांची घेणेकरी प्रक्रिया सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| **कर्जदार / गहाणकाराचे नाव व पत्ता** | मे. ब्लू रिज हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)<br>**कॉर्पो. कार्या.:** बी-१, २०४, दुसरा मजला, बूमबर्ग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओजवळ, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००७२.<br>**नोंद. कार्या.:** ऑफिस क्र. ५एबी, पाचवा मजला, ऋषभ चेंबर्स, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००५९.<br>**अवसायकांचा पत्ता :** प्राधिकृत अवसायक, हायकोर्ट, बॉम्बे, पाचवा मजला, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, फोर्ट, एम.जी. रोड, मुंबई-४०००२३. |
| **संचालकांचे नाव** | १. श्री. पीटर रॉबर्ट चार्ल्स ओल्डेन (चेरी कॉटेज, ऑलफोर्ड लेन, हॉलस्टीड, सेवन ओक्स, केंट, लंडन, टीएन१४७ई, युनायटेड किंगडम).<br>२. श्री. राजीब दत्तात्रय (बी-७०१, इरेसा, आरबीके स्कूलशेजारी, बेवर्ली पार्क, मीरा रोड (पू.), ठाणे – ४०११०७). |
| **सुरक्षित धनकोंचे थकबाकी कर्ज** | **अनु. १३(२) सूचनेनुसार त्यांनी केलेल्या संबंधित कसुरीच्या दिनांकापासून करारातील/दस्तावेजामधील दरांनी पुढील व्याज आणि इतर आनुषंगिक खर्च इ.सह सुरक्षित धनकोंची थकबाकी देणी.**<br>बँक ऑफ इंडिया : ०२.०८.२०१८ रोजी USD १२.४१२ मिलियन (रु. १०२.६८ कोटी)<br>ॲक्सिस बँक लिमिटेड : ०७.१२.२०१८ रोजी USD १९,१०३,७९०.९४<br>स्टेट बँक ऑफ इंडिया : १६.०२.२०१८ रोजी रु. ९३,८९,८३,७३३.१४<br>सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया : १२.०३.२०१८ रोजी रु. ३७,०८,७०,९५२.००<br>अधिक मासिक हप्त्याने चक्रवाढ अशा करारातील दराने न आकारलेले व्याज अधिक इतर शुल्के इ. |
| **ताबा** | बँक ऑफ इंडिया यांनी दि. २२.०४.२०२१ रोजी सरफेसी अधिनियमातील तरतुदींनुसार प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे |
| **स्वारस्य अभिव्यक्ती सादरीकरण** | २३ ऑक्टोबर २०२४ ते ०४ नोव्हेंबर २०२४ |
| **पाहणीचा दिनांक** | ०५ नोव्हेंबर २०२४ ते २२ नोव्हेंबर २०२४ (कामकाजाच्या दिवशी) स. ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत |
| **योग्य ती खबरदारी दिनांक** | ०५ नोव्हेंबर २०२४ ते २२ नोव्हेंबर २०२४ |
| **बयाणा रक्कम** | रु. १९,६०,००,०००/- (रुपये एकोणवीस कोटी साठ लक्ष फक्त) (मूळ प्रस्तावाच्या १०%) |
| **बयाणा रक्कम सादरीकरणाचा शेवटचा दिनांक** | २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत |
| **आरक्षित किंमत** | रु. १९६,००,००,०००/- (रुपये एकशे शहाण्णव कोटी फक्त) |
| **बोली वृद्धी** | रु. १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) |
| **ई-लिलावाचा दिनांक व वेळ** | २६ नोव्हेंबर २०२४ रोजी स. १० ते दु. १ वाजेपर्यंत |
| **बँक ऑफ इंडियास ज्ञात असलेले प्रलंबित खटले** | अधिकृत अवसायकांद्वारे अवसायन प्रक्रिया/घेणेकरी यांनी सुरू केलेल्या अनामतीवरील कारवाई प्रक्रियेशिवाय आमच्या माहितीप्रमाणे इतर काही नाही. |
| **बँक ऑफ इंडियास ज्ञात बोजे** | नाहीत |
| **अनामत मत्तेचे वर्णन** | १. मे. ब्लू रिज हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात) यांचे मालकीच्या मालकी हक्कविषयक कागदपत्रांनुसार सुमारे ४६८४ चौरस यार्ड म्हणजे ३९१६ चौरस मीटर जमीन, इमारत व इतर संरचना, सिटी सर्वे रेकॉर्डनुसार सुमारे ३९३७ चौरस मीटर, सिटी सर्वे क्र. ७८० आणि सर्वे क्र. ७७ए/१डी, ७७/३ए/२, ७७ए/४ए/१, ७७ए/५/१, ७७ए/७ (काही भाग) आणि ७७ए/८सी (जुना सर्वे क्र. ७७ हिस्सा क्र. १ (काही भाग), ३ (काही भाग), ४ (काही भाग), ५ (काही भाग), ७ (काही भाग) व ८ (काही भाग), मरोळ गाव, तालुका अंधेरी, अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ गाव, मुंबई उपनगरीय जिल्हा, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत या मालमत्तेचे समन्याय तारण;<br>२. मे. ब्लू रिज हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात) यांचे मालकीच्या (अ) सुमारे १३९२.४६ चौरस मीटर, सर्वे क्र. ७९, हिस्सा क्र. १४ए/काही भाग, आता सर्वे क्र. ७९सी/१ व सिटी सर्वे क्र. ७७७ (काही भाग), पूर्वीचा सिटी सर्वे क्र. ७७७ (काही भाग) आणि ७७७/६ ते २२ आणि सर्वे क्र. १४ए (काही भाग) किंवा ७०सी, मरोळ गाव आणि (ब) सुमारे २०२. ३३४ चौरस मीटर, सर्वे क्र. ७९, हिस्सा क्र. १७, आता सर्वे क्र. ७९-डी व सिटी सर्वे क्र. ७८१ (पूर्वीचा सिटी सर्वे क्र. ७८१ व सर्वे क्र. ७९डी/१७) मरोळ गाव, तालुका अंधेरी, मुंबई उपनगरीय जिल्हा येथील जमीन, इमारत व इतर संरचना आणि बिल्डिंगचा परिसर आणि इतर संरचना, अंधेरी कुर्ला रोड, मरोळ गाव, अंधेरी (पूर्व), मुंबई, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आणि मालमत्तेमधून जाणारा ३९७ चौरस मीटरचा अंतर्गत रस्त्यासाठी असलेल्या परिसर आणि मालमत्तेकडे जाणारा ८२०.५१ चौरस मीटरचा सामायिक रस्ता या जागेचे समन्याय तारण आणि<br>३. मे. ब्लू रिज हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात) यांचे मालकीच्या जमीन, इमारत व इतर संरचना, क्षेत्रफळ सुमारे ३७२४ चौरस यार्ड म्हणजे ३११६.९८७९ चौरस मीटर, सिटी सर्वे क्र. ७८७ आणि सर्वे क्र. ७७ ए, हिस्सा क्र. ९सी व सर्वे क्र. ७७बि, मरोळ गाव, तालुका अंधेरी, मुंबई उपनगरीय जिल्हा, सोबत तेथील इमारत परिसर आणि इतर संरचना, अंधेरी कुर्ला रोड, मरोळ गाव, अंधेरी (पूर्व), मुंबई, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत या मालमत्तेचे समन्याय तारण.<br>**टीप: (१) वर नमूद क्षेत्रफळ मालकी हक्काच्या कागदपत्रांनुसार आहे. (२) बीएमसी नुसार मंजूर आराखड्यात मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ आहे ७६७४.५६ चौ.मी. (३) सदर क्षेत्रफळ 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे काही आहे', 'तेथे जे काही आहे' आणि 'उपाय नाही' आधारावर समजण्यात यावे.** |
| **प्राधिकृत अधिकाऱ्याचे तपशील** | श्री. सुभाष कुमार – मुख्य व्यवस्थापक;<br>ई-मेल : andherilcb.mumbainorth@bankofindia.co.in |
| **अधिक तपशिलासाठी संपर्क** | BOBCAPS (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)<br>१) श्री. सागर भद्र - एव्हीपी; फोन: +९१७६६६४१२३९५ ईमेल : sagar.bhadra@bobcaps.in<br>२) श्री. ऋषी शाह - एएम; फोन : +९१८२९१८९७८६२, ईमेल : rishi.shah@bobcaps.in |

ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया बँक ऑफ इंडिया वेबसाइटवर https://bankofindia.co.in येथे किंवा BOBCAPS च्या वेबसाइटवर https://www.bobcaps.in/tenders येथे दिलेली लिंक पाहावी

स्वा/-
श्री. सुभाष कुमार, मुख्य व्यवस्थापक
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

स्थान : मुंबई
दिनांक : २२ ऑक्टोबर २०२४


## पूर्व किनारपट्टीवर चक्रीवादळाला तोंड देण्याची तयारी

**पीटीआय, भुवनेश्वर, कोलकाता**

**बंगालच्या उपसागरामध्ये** कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात झाले असून बुधवारी, २३ ऑक्टोबरला त्याचे रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता असल्याची माहिती हवामान विभागाने (आयएमडी) मंगळवारी दिली. मात्र, बंगालच्या उपसागरातील या घडामोडींचा महाराष्ट्राला काही फटका बसणार नाही. दरम्यान, चक्रीवादळाचा धोका विचारात घेऊन तटरक्षक दलाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितले की येऊ घातलेल्या चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका ओडिशाला बसणार आहे. 'आयएमडी'ने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता तीव्र कमी दाबाच्या क्षेत्राचा मध्यबिंदू ओडिशातील पारादीपपासून ७०० किलोमीटर अंतरावर आणि पश्चिम बंगालमधील सागर बेटापासून ७५० किलोमीटर अंतरावर होता. या क्षेत्राचे रुपांतर २३ ऑक्टोबरमध्ये चक्रीवादळामध्ये होईल आणि २५ ऑक्टोबरच्या पहाटे उत्तर ओडिशा व पश्चिम बंगालच्या दक्षिण किनाऱ्यावरून ते पुढे जाईल. त्यावेळी त्याचा वेग ताशी १०० ते ११० किलोमीटर असेल आणि तो ताशी १२० किलोमीटर वेगापर्यंत वाढू शकतो.

ओडिशा सरकारने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या १० अतिरिक्त तुकड्या मागवल्या आहेत. त्याशिवाय ओडिशा आपत्ती जलद कृती दलाच्या १७ तुकड्या आधीच संभाव्य प्रभावित क्षेत्राकडे पाठवण्यात आल्या आहेत अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री सुरेश पुजारी यांनी दिली.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानातील स्टॉल वाटपाबाबत.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथे येणाऱ्या अनुयायींच्या सोयीसाठी छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानात विविध संस्था आणि व्यक्ती इत्यादींमार्फत दरवर्षी विविध सेवा-सुविधा पुरविल्या जातात. तसेच समाज प्रबोधनासाठी पुस्तके व इतर साहित्यांची विक्री केली जाते. हे सर्व उपक्रम दरवर्षी आयोजित केले जातात.

त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्या व्यक्ती व संस्था या उपक्रमात सहभागी होऊ इच्छितात त्यांनी त्यांचे रितसर अर्ज सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग यांच्या मालमत्ता अधिकारी कार्यालयात दि. 18.11.2024 या अंतिम दिनांकापर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 04.30 या वेळेत प्रत्यक्ष सादर करावेत.

**अर्ज सादर करण्याची पद्धती व सूचना खालीलप्रमाणे आहेत.**

1. स्टॉलधारकाने आपले अर्ज आवक-जावक जी/उत्तर विभागात जमा करण्यापूर्वी मालमत्ता अधिकारी जी/उत्तर विभागात घेऊन यावेत. त्यानंतर सदर अर्ज आवक-जावक विभागात स्वीकारण्यात येतील.
2. आवक-जावक विभागात परस्पर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच पोस्ट किंवा कुरियरने अर्ज पाठविल्यास ते रद्द समजण्यात येतील.
3. जाहिरातीत नमूद अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि. 18.11.2024 पर्यंतच अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
4. अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 04.30 पर्यंतच स्वीकारले जातील.
5. अर्जासोबत स्वतःची ओळख दर्शविणारे फोटो असणारे (पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, निवडणूक ओळखपत्र) कोणताही एक पुरावा ओळखपत्र म्हणून सादर करावा.
6. प्रत्यक्ष स्टॉलच्या कार्यस्थळी 05 स्वयंसेवक स्वच्छता करणे, गर्दीचे नियोजन करणे व इतर कामे करण्याकरिता पूर्ण वेळ उपस्थित असणे अनिवार्य असून संबंधित स्वयंसेवकाचे ओळखपत्र (आधार कार्ड इ.) व मोबाइल क्रमांक अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. सदर स्वयंसेवक महापालिकेस योग्य ते सहकार्य करतील व दिलेल्या आदेशांचे पालन करतील.
7. प्राप्त अर्जांची वर्गवारी करून स्टॉलचे प्रत्यक्ष वाटप दि. 29.11.2024 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून ''प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य'' या तत्त्वावर करण्यात येईल. स्टॉलचे वाटप सकाळी 11.00 पासून संध्याकाळी 05.30 वाजेपर्यंत व स्टॉल शिल्लक असेपर्यंत केले जाईल.
8. स्टॉल वाटपाच्या दिवशी वाटपपत्र स्वीकारण्यासाठी अर्जदाराने मूळ ओळखपत्रासह स्वतः हजर राहणे बंधनकारक आहे.
9. कोणत्याही कारणास्तव नातेवाईक किंवा प्रतिनिधीस वाटपपत्र देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
10. विहित तारखेच्या म्हणजेच दि. 18.11.2024 रोजीच्या आत अर्ज जरी सादर केला असला तरी प्रत्यक्ष स्टॉलवाटप दिवशी जो अर्जदार प्रथम येईल त्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.
11. एका अर्जदारास फक्त एका वर्गवारीतील एक स्टॉलचे वाटप करण्यात येईल. अर्जदाराने एकापेक्षा अधिक वर्गवारीतील स्टॉलसाठी अर्ज केले असल्याचे किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचे इतर अर्ज रद्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.
12. प्रत्यक्ष कार्यक्रमादरम्यान वाटप केलेल्या स्टॉलच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याची जबाबदारी संबंधित स्टॉलधारकाची राहील, याची नोंद घ्यावी.
13. प्रत्येक स्टॉलधारकाकडून सौजन्याने व सामंजस्याने सामाजिक कार्य करणे हेतू सहकार्य अपेक्षित आहे.

**वाटप करण्यात येणाऱ्या स्टॉलची वर्गवारी संख्या व शुल्क खालीलप्रमाणे आहे.**

| अनु. क्र. | स्टॉलची वर्गवारी | स्टॉलचे शुल्क + 18% GST | स्टॉलची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | मोफत पाणीवाटप | 25 + GST | 25 |
| 2 | मोफत अन्नवाटप | 25 + GST | 80 |
| 3 | कॅसेट स्टॉल | 100 + GST | 55 |
| 4 | मंडप | 750 + GST | 9 |
| 5 | सामान्य स्टॉल (औषधवाटप, पुस्तक स्टॉल इत्यादी) | 100 + GST | 300 |
| | एकूण | | 469 |

**संपर्क पत्ता :**
मालमत्ता अधिकारी, खो. क्र. 45, दुसरा मजला, जी/उत्तर विभाग कार्यालय, हरिशचंद्र येवले मार्ग, प्लाझा सिनेमाच्या मागे, दादर (पश्चिम), मुंबई-400 028.
**दूरध्वनी क्रमांक :** 69517800/990/991/992 वेळ सकाळी 10.30 ते दुपारी 02.00.

स्वाक्षरी/-
**सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर**

**टीप :** स्टॉलचे चलन मालमत्ता अधिकारी जी/उत्तर विभागात तयार करून स्टॉलबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्र, जी/उत्तर विभाग कार्यालय, तळमजला, ह. ये. मार्ग, दादर (प.), मुं-400 028 येथे सकाळी 11.00 ते संध्याकाळी 05.30 या वेळेतच भरणा करावा. (सार्वजनिक सुट्टी तसेच शनिवार व रविवार वगळून.)

पीआरओ/१८०४/एडीव्ही/२०२४-२५ **खाण्यापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.**


# धर्मनिरपेक्षता म्हणजे जगा आणि जगू द्या!

## सर्वोच्च न्यायालयाकडून उत्तर प्रदेश मदरसा कायद्यावरील निकाल राखीव

**पीटीआय, नवी दिल्ली**

**जगा आणि जगू** द्या हा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आहे असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालय मंगळवारी नोंदवले. मदरशांचे नियमन करणे भारताच्या हिताचे आहे कारण अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र कप्पे तयार करून शेकडो वर्षांची संमिश्र संस्कृती नष्ट केली जाऊ शकत नाही असे न्यायालयाने स्पष्ट केले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशचा २००४चा मदरसा घटनाबाह्य ठरवला होता. त्याविरोधातील याचिकांवर मंगळवारी सुनावणी झाली.

उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधातील याचिकांवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे बी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर दिवसभर सुनावणी झाली. सर्व युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने निकाल राखीव ठेवला. सर्वोच्च न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नावर 'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २००४' कायम ठेवावा अशी आपली भूमिका असल्याचे उत्तर प्रदेश सरकारने स्पष्ट केले. तसेच उच्च न्यायालयाने संपूर्ण कायदा घटनाबाह्य ठरवायला नको होता असेही मत व्यक्त केले. ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडल्यावर, त्याच्याशी सहमत असल्याचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सांगितले. धर्मनिरपेक्षता म्हणजे जगा आणि जगू द्या असे ते म्हणाले आणि मदरशांचे नियमन करणे हे राष्ट्रीय हिताचे नाही का असा प्रश्न केला.

धार्मिक सूचना केवळ मुस्लिमांसाठी नाहीत; त्या हिंदू, शीख, ख्रिश्चन इत्यादी सर्वांसाठी आहेत. देशामध्ये संस्कृती, सभ्यता आणि धर्म यांचे मिश्रण असायला हवे असे खंडपीठाने सांगितले. धार्मिक संस्थांमध्ये धर्मनिरपेक्ष विषय शिकवण्याच्या सूचना केवळ इस्लामिक संस्थांसाठी असू नयेत. वेद पाठशाळा, बौद्ध भिक्खूंच्या प्रशिक्षण संस्था, जैनांच्या संस्था या सर्वांसाठी लागू असतील असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### फक्त मदरशांचीच चिंता का?

**मदरशांसारख्या संस्थांच्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी व्यवसाय करता येणार नाहीत असा युक्तिवाद राष्ट्रीय बालहक्क आयोगाने (एनसीपीसीआर) केला. त्यावर, संस्थेला केवळ मदरशांचीच चिंता का आहे असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला. ज्येष्ठ वकिल स्वरुपमा चतुर्वेदी यांनी 'एनसीपीसीआर'ची बाजू मांडली. मुख्य प्रवाहातील शिक्षणासाठी मदरशांकडे पर्याय म्हणून पाहिले जाऊ शकत नाही असे त्या म्हणाल्या. त्यावर एनसीपीसीआरने सर्व समुदायांच्या शैक्षणिक संस्थांना धर्मनिरपेक्ष विषय शिकवण्यासंबंधी सूचना केल्या आहेत का असा प्रश्न सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी विचारला.**

## गुजरातमध्ये बनावट न्यायालयाचे पितळ उघड

**पीटीआय, अहमदाबाद**

**गुजरात पोलिसांनी** गांधीनगर भागातील एका बनावट न्यायालयाचे पितळ उघड केले आहे. या कारवाईत पोलिसांनी २०१९पासून सुरू असलेल्या एक कारस्थानी योजना उघड केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मॉरिस सॅम्युअल ख्रिश्चन या व्यक्तीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मॉरिस ख्रिश्चन स्वतः न्यायाधीश असल्याचे भासवत फसव्या लवादाच्या माध्यमातून विशेषतः जमीन व्यवहाराच्या खटल्यांचा निवाडा करत होता. त्यासाठी त्याने बनावट न्यायालयही अशा पद्धतीने उभारले होते की पक्षकारांना ते अस्सल वाटत. अशा प्रकारे त्याने अनेकांची फसवणूक केली होती.

चौकशीमध्ये असे दिसून आले की, ख्रिश्चन जमिनीच्या वादात अडकलेल्या संशयास्पद व्यक्तींना हेरत असे. त्यानंतर भरपूर शुल्काच्या बदल्यात त्यांच्या खटल्यांचा जलद निपटारा करण्याचे आश्वासन देत असे. अशा प्रकारे त्याने अशिलांच्या बाजूने अनेक निकाल दिले होते.

ख्रिश्चनने सर्वात प्रथम २०१९मध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित असलेल्या सरकारी जमिनीच्या खटल्याचा निकाल दिला. त्यामध्ये त्याच्या अशिलाने संबंधित जमिनीच्या उताऱ्यावर आपले नाव लावण्यासाठी खटला दाखल केला होता अशी माहिती पोलिसांनी दिली.

## दिल्लीमधील शाळांना बॉम्बच्या धमक्या

**नवी दिल्ली :** दिल्ली आणि हैदराबादमधील तीन सीआरपीएफ शाळा आणि अन्य शहरांमधील सुरक्षा दलांच्या कार्यालयांच्या आवारातील दोन केंद्रीय विद्यालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल मिळाल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी मंगळवारी दिली. मात्र ही धमकी अफवाच ठरली असेही त्यांनी सांगितले. धमक्यांचा ईमेल मिळाल्यानंतर तपास पथकाने शोध घेतला असता काहीही संशयास्पद आढळून आले नाही. यानंतर शाळांचे वर्ग सुरळीत पार पडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

धमकी मिळालेल्या शाळांमध्ये दिल्लीतील रोहिणी व द्वारका भागातील आणि हैदराबादमधील प्रत्येकी एक सीआरपीएफ शाळा, हरियाणाच्या पंचकुला आणि उत्तर प्रदेशच्या रामपूर येथील निमलष्करी दलाच्या कार्यालयाच्या आवारातील प्रत्येकी एक केंद्रीय विद्यालय यांचा समावेश होता. या प्रकरणी सायबर कक्षाने तपास सुरू केल्याचे दिल्लीच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## पावसामुळे सव्वा लाख हेक्टर शेतीचे नुकसान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात दोन दिवस झालेल्या पावसामुळे १ लाख २४ हजार ११९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नाशिक जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला असून, ६४,९०२ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. त्याखालोखाल रायगड, पालघरमध्ये नुकसानीचा आकडा मोठा आहे. प्रामुख्याने काढणीला आलेला भात, कडधान्ये, सोयाबीन आणि कापूस पिकाला फटका बसला आहे.

राज्यात गेली दोन दिवस पावसामुळे काढणीला आलेल्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. खरीप पिकांची काढणी पूर्ण करून रब्बी हंगामाची तयारी करावयाची असल्यामुळे शेतकरी रात्रीचा दिवस करून राबत आहे. अशा ऐन सुगीच्या काळातच पावसाने दाणादाण उडवून दिली आहे.

सकाळपासून दुपारपर्यंत असह्य उकाडा आणि दुपारनंतर वादळी वारे, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. कमी काळात जास्त पाऊस होत असल्यामुळे शेतशिवारात पाणी साचत आहे. अनेक ठिकाणी गुडघाभर पाण्यातून भात बाहेर काढला जात आहे. नाशिकसह उत्तर महाराष्ट्रात सततच्या पावसामुळे सोयाबीन काळे पडून हातचे गेले आहे. उत्तर महाराष्ट्रात झालेल्या पावसामुळे वेचणीला आलेला कापूस भिजला आहे. उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात झालेल्या पावसामुळे कडधान्य पिकांना फटका बसला आहे. नाशिक जिल्ह्यात प्रचंड नुकसान झाले आहे.



### आठवडाभर पावसापासून मुंबईकरांना दिलासा

**मुंबई :** राज्यात गेली दोन दिवस धुमाकूळ घालणारा मोसमोत्तर पाऊस आठवडाभर विश्रांती घेणार आहे. पावसापासून दिलासा मिळणार असला तरीही दिवसाच्या तापमानात वाढ होऊन ऑक्टोबरअखेरी असह्य उकाड्याचा सामना करावा लागणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रातील वाऱ्याच्या चक्रीय स्थितीमुळे पश्चिम किनारपट्टीवर येणारे बाष्पयुक्त वारे कमी झाले आहे. बंगालच्या उपसागरावरून राज्याकडे येणारे बाष्पयुक्त वारेही कमी झाले आहे. उत्तर भारतातून राज्याकडे येणाऱ्या कोरड्या वाऱ्याचा दाब वाढला आहे. त्यामुळे बुधवारपासून राज्यात पावसाचे प्रमाण कमी होणार आहे.